# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

उप-आयुक्त (परि.-दोन) यांचे कार्यालय, एफ/दक्षिण विभाग कार्यालय, परळ, मुंबई - ४०० ०१२.

क्र. एमडीएफ/ओडी/६६४/जन, दिनांक ०३.०६.२०१७

विषय :- सार्वजनिक गणेशोत्सव - २०१७.

संदर्भ :- क्र.एमडीएफ/ओडी/४१८/जन, दि.१२.०५.२०१७

सार्वजनिक गणेशोत्सव-२०१७ च्या संदर्भात पुढील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत -

**<u>गणपतीच्या मूर्ती तयार करण्यासाठी तात्पुरते मंडप बांधण्याबाबतः</u>**

१. मंडपाच्या परवानगीबाबत – परिपत्रक क्र.एमडीएफ/ओडी/४५९/जन, दि.३०.०५.२०१६ अनुसार यावर्षी मंडपाच्या परवानगीचे दर साधारणतः १०% नी वाढविण्यात येतील. याबाबत सर्वसाधारण ३ प्रकारची वर्गवारी करण्यात आली असून, त्यानुसार परवानगीचे दर खालील प्रमाणे असतील :

| आकारमान | शुल्क |
|---|---|
| ५०० चौ. फुटापर्यंत | - रु. ७२०/- + १५ % सेवाशुल्क |
| ५०० ते १००० चौ. फुटापर्यंत | - रु. १०८०/- + १५ % सेवाशुल्क |
| १००० चौ. फुटापेक्षा जास्त | - रु.१४४०/- + १५% सेवाशुल्क |

२. प्रत्येक मंडपाकरिता अनामत रक्कम रु.२८८०/- एवढी देय असेल.

३. खाजगी जमिनीवर मालकाच्या परवानगीने क्षेत्रफळ विचारात न.घेता, रु.७२०/- + १५% सेवाशुल्क इतके शुल्क आकारुन परवानगी दिली जाईल.

४. विभाग कार्यालयामार्फत मूर्तीकार व मंडपाना परवानगी देताना परिपत्रक क्र. एमडीएफ/४१८/जन दि.१२.०५.२०१७ मधील तरतूदी विचारात घेण्यात याव्यात.

५. जर काही कारणाने मूर्तीकाराचे घर किंवा मूर्ती बनविण्याच्या जागा प्रकल्पबाधित झाल्यास संदर्भाधीन परिपत्रकातील अटी शर्तीची पूर्तता होत असल्यास नवीन ठिकाणी पूर्वीइतक्याच क्षेत्रफळाची परवानगी देण्यास हरकत नाही.

६. जर जुन्या मूर्तीकाराने अर्ज केला नाही तर त्याच जागेसाठी नवीन मूर्तीकारास प्रथम आलेल्यास प्राधान्य या तत्वाने परवानगी देण्यात येईल. परंतु जागेचे आकारमान आणि एकूण मंडपाची संख्या यात बदल होणार नाही.

७. सार्वजनिक जागेवर मूर्तीकारांना/मंडपांना परवानगी देता येणार नाही. खाजगी जागेवर अशा प्रकारची परवानगी मागणारा मूर्तीकार हा पारंपारिक मूर्तीकार असणे अनिवार्य असेल व त्यास दोन्ही उपनगरांमधून कोणत्याही एकाच ठिकाणी परवानगी देता येईल.

८. मूर्तिकार व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मंडप उभारण्यासाठी रस्ते/फूटपाथवर खड्डे खणू नयेत, अन्यथा नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ३०.०५.२०१७ | ०३.०६.२०१७ |
| उप-आयुक्त (परि.-दोन) | अति.आयुक्त (पूर्व उपनगरे) |